नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/०४/२०२५ (सोमवार)

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हे नोंद
## एकुण ९१ लाख ३० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक १३/०४/२०२५ रोजी भिवापुर पोलीस पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भिवापुर पोलीसांनी नाकाबंदी करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रं १**:— पोलीसांनी पाटील पेट्रोलपंप ,भिवापुर **येथे** नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **ट्रक क्र. एम.एच. ४० बी.एल. ३२३८** हा मिळुन आला त्यास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे अफसर अहिया खॉन, वय २५ वर्षे, रा गरिब नवाज चौक, चकोले ले आउट, खरबी नागपुर हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस केली असता वाहन मालक अफसर खॉन अहिला खॉन रा. गरिब नवाज चौक, चकोले ले आउट, खरबी नागपुर** याच्या सांगण्यावरून शिवनाडा गावाजवळील ठिय्या, ता. पवनी जि.भंडारा येथुन अवैध्यरित्या रेती भरून आणल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) ६ ब्रास रेती किंमती ३०,००० /— रूपये आणि २) ट्रक क्र एम.एच ४० बी.एल .३२३८ किंमती २०,००,०००/— रूपये असा एकुण २०,३०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं २ :—** पोलीसांना **मालेवाडा फाटा ,भिवापुर येथे** नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **१) १० चक्का टिप्पर क्र. एम.एच. ४९ ए. टी. ८०१२** मिळुन आला वाहन थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये **६ ब्रास** रेती आढळुन आली . वाहन चालक **आरोपी नामे फारूख रियाज शेख, वय २३ वर्षे, रा.खरबी नागपुर, हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस केली असता वाहन मालक ईस्राईल अकबर खॉन, वय ३२ वर्षे, रा.खरबी नागपुर** याच्या सांगण्यावरून शिवनाडा गावाजवळील ठिय्या, ता. पवनी जि.भंडारा येथुन अवैध्यरित्या रेती भरून आणल्याची माहीती प्राप्त झाली. २) **१२ चक्का टिप्पर क्र. एम.एच ४९ बी. झेड. ७२३७** मिळुन आला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये ८ ब्रास रेती आढळुन आली . वाहन चालक **आरोपी नामे समसाद ईस्राफिल खॉन, वय ३० वर्षे, रा.काठीराव हाजी चौक, रांची झाारखंड, ह. मु. गरीब नवाज चौक, नागपुर हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. अधिक विचारपुस असता वाहन मालक ईस्माईल अंसारी वय, ४० वर्षे, रा. गरीब नवाज चौक नागपुर** याच्या सांगण्यावरून हळदा घाट, जंगलवाडी, ता ब्रम्हपुरी जि चंद्रपुर येथुन अवैध्यरित्या रेती भरून आणल्याची माहीती प्राप्त झाली. **३) १० चक्का टिप्पर क्र. एम.एच. ४० सी. एम. ३४६१** मिळुन आला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये **६ ब्रास रेती** आढळुन आली . वाहन चालक **आरोपी नामे रूकसाद ईस्राईल खॉन, वय २३ वर्षे रा. गरीब नवाज चौक नागपुर हा मिळुन आला. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक जुल्फेगार खॉन,वय ५५ वर्षे, रा. गरीब नवाज चौक नागपुर** याच्या सांगण्यावरून शिवनाडा गावाजवळील ठिय्या, ता. पवनी जि.भंडारा येथुन अवैध्यरित्या रेती भरून आणल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष नमुद वाहनामधुन १) २० ब्रास रेती ५०००/— रूपये प्रति ब्रास किंमती १,००,००० /— रूपये आणि २)** १० चक्का टिप्पर क्र. एम.एच. ४९ ए. टी. ८०१२ **किंमती २०,००,०००/— रूपये आणि ३)** १२ चक्का टिप्पर क्र. एम.एच ४९ बी. झेड. ७२३७ **किंमती ३०,००,०००/— रूपये ४)** १० चक्का टिप्पर क्र. एम.एच ४० सी. एम. ३४६१ **किंमती २०,००,०००/— रूपये असा एकुण ७१,००,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

सदर कारवाईत २६ ब्रास रेती आणि चार वाहन असा एकुण ९१,३०,००० /— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम, सह कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. ,सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द  गुन्हा नोंद
## देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक १३/०४/२०२५ रोजी देवलापार पोलीस रात्रगस्त करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, जबलपुर कडुन नागपुर मार्गे पांढऱ्या रंगाच्या कार मध्ये कत्तलीकरीता अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी देवलापार पोलीस स्टेशन समोर नाकाबंदी केली असता एक पांढऱ्या रंगाची **Asta VXI कार क्रमांक एम.एच. ३१ डी.सी. २३१३** ही भरधाव वेगाने येताना दिसली. सदर वाहनास थांबवुन पंचासमक्ष **वाहनाची** पाहणी केली असता त्यामध्ये ४ गोवंश जनावरे निर्दयते कमी जागने दाटीवाटीने कोंबुन,आखुड दोरीने बांधुन ,चारापाण्याची सोय न करता, वाहतुक करतांना मिळुन आले . सदर वाहनामध्ये चालक **मसुद साजिद कमाल, वय २० वर्षे,रा. नविन पोलिस स्टेशन समोर कामठी, जि नागपुर आणि त्याच्या साथीदार मोहम्मद असद मोहम्मद असलम वय २६ वर्षे,रा. नविन पोलिस स्टेशन बाजुला येरखेडा, कामठी,जि नागपुर** असे मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन **एक पांढऱ्या रंगाची Asta VXI कार क्रमांक एम.एच. ३१ डी.सी. २३१३ किंमती ३,५०,०००/— रूपये आणि ४ गोवंश जनावरे किंमती ३०,००० /— रूपयाचा एकुण किंमती ३,८०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांच्या विरूध्द कलम २८१, ३(५), ३२५ भारतीय न्याय संहिता २०२३ सहकलम ११(१)(डी) प्राण्याचां छळ प्रतिबंधक अधिनियम, सहकलम ५ ए , ९ महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम , सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, साहकलम १८४ मोटर वाहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैधरित्या देशी,विदेशी, मोहाफुल दारू बाळगणा—या आरोपीतांवर
# नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई
# ३१ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद  एकुण ४७,३५३/—रूपयांचा मुद्‌देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक १३/०४/२०२५** रोजी दारूबंदी कायदाअंतर्गत कारवाई बाबत विशेष मोहीम राबविली असुन सदर मोहीमेदरम्यान नागपुर ग्रामीण जिल्हयाचे विविध पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, बेला, कुही, काटोल, नरखेड, कोंढाळी, देवलापार,रामटेक, पारशिवणी, खापा,केळवद,कळमेश्वर, खापरखेडा, मौदा आणि कन्हान अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या वर छापा टाकुन  **देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू सह ,दारू वाहतुकी साठी वापरलेली मोटरसायकल असा एकुण ४७,३५३/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला आहे. ३१ आरोपीतांवर ३१ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने